MHPA060008852020

# – न्या य नि र्ण य –

(आज दिनांक ०२ मे, २०२२ रोजी पारित)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) प्रमाणे खटला चालविण्यात आला.

२. दिनांक ०१.०९.२०२१ रोजी निशाणी क्र.११ अन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) प्रमाणे आरोपीविरुद्ध आरोपाचा सार तयार करण्यात आला. आरोपाचा सार मातृभाषेत आरोपीला वाचुन व समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा कबूल केला नाही, म्हणून खटला पुढे चालविण्यात आला.

३. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने एकुण दोन साक्षीदार तपासले. ते तपासलेले साक्षीदार म्हणजे पंच श्री मुरलीधर संभाजी राऊत (अ.सा.क्र.१) व खबर देणार/तपासीक अंमलदार पोलीस हवालदार ब.नं. ४६२ श्री राजेश नामदेवराव ठोके (अ.सा.क्र.२). खटल्यात अभियोगपक्षाने रासायनिक विश्लेषण अहवाल निशाणी क्र.१७ अन्वये दाखल केला. दिनांक २१.०२.२०२२ रोजी निशाणी क्र.०१ वर अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्याचा आदेश पारित करण्यात आला.

४. दिनांक २१.०२.२०२२ रोजी आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले. आरोपीचा बचाव असा आहे की, त्याला खोट्या गुन्ह्यात गुंतविण्यात आले आहे. आरोपीने त्याच्या बचावात स्वतःला किंवा इतर साक्षीदारांना तपासले नाही.

५. अभियोगपक्षातर्फे विद्वान विशेष सहाय्यक सरकारी वकील श्री ए.एम. इंगळे व आरोपीतर्फे श्री एस.पी. गावंडे वकिलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

६. अभिलेखावरील पुराव्यावरुन आणि दोन्ही पक्षांच्या युक्तिवादावरुन न्यायनिर्णयासाठी उपस्थित झालेले प्रश्न कारणमिमांसासहीत पुढीलप्रमाणे–

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक ०९.०४.२०१९ रोजी १६.३० वाजेच्या सुमारास, मौजे फाळेगाव येथील आरोपीच्या घरासमोर मोकळया जागेत, ता. जि. हिंगोली, येथे आरोपीच्या ताब्यातून देशी दारु भिंगरी संत्राच्या प्रत्येकी १८० मिलीच्या १० बाटल्या मिळून आल्या, म्हणून आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम–६५ (ई) अंतर्गत गुन्हा | नाही. |

केला?

२) काय आदेश ? **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.**

## कारणमिमांसा

### विचाराधीन प्रश्न क्र.०१ बाबत –

७. **खबर देणार/तपासीक अंमलदार श्री राजेश ठोके (अ.सा.क्र.२)** यांनी त्यांचे पुराव्यात असे कथन केले की, दिनांक ०९.०४.२०१९ रोजी ते पोलीस ठाणे, हिंगोली (ग्रामिण) येथे बीट अंमलदार पदावर कार्यरत होते. सदर दिवशी ते इतर कर्मचाऱ्यांसह बीट परिसरात गस्त करित असतांना मौजे फाळेगाव फाट्यावर त्यांना गुप्त बातमीदाराकडुन, एक इसम हा मौजे फाळेगाव येथे त्याच्या घरासमोर देशी दारुची अवैध विक्री करित असल्याची, बातमी मिळाल्याचे, त्यांनी कथन केले. त्यावरुन त्यांनी दोन पंचांना घेवुन घटनास्थळी १६.३० वाजेच्या सुमारास छापा मारल्याचे, कथन केले. त्यावेळी त्यांना आरोपी मिळुन आल्याचे व आरोपीस त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव गजानन कांताप्रसाद जैस्वाल, रा. फाळेगाव सांगितल्याचे, कथन केले. त्यानंतर त्यांनी आरोपीच्या ताब्यातुन एका पिशवीतुन प्रत्येकी १८० मिलीच्या देशी दारु भिंगरी संत्राच्या एकुण १० बॉटल्या मिळुन आल्याचे व त्याबाबत त्यांनी दोन पंचांसमक्ष जप्ती पंचनामा (निशाणी क्र.१३) तयार केल्याचे, कथन केले. त्यानंतर त्यांनी जप्त मुद्देमालातील एक निप रासायनिक तपासणीकरिता वेगळी काढुन त्यावर पंचांच्या व त्यांच्या सहीचे लेबल लावुन त्यास सिल केल्याचे, कथन केले. त्यानंतर त्यांनी आरोपीविरुध्द फिर्याद (निशाणी क्र.१४) दिल्याचे व त्यावरुन छापील नमुन्यातील प्रथम खबरी अहवाल (निशाणी क्र.१५) नोंदविल्याचे, कथन केले. त्यानंतर प्रस्तुत प्रकरणाची केस डायरी त्यांना प्राप्त झाल्यावरुन त्यांनी तपासादरम्यान साक्षीदारांची बयाने नोंदविल्याचे व त्यांनी जप्त मुद्देमालापैकी एक निप दारु रासायनिक न्यायसहायक प्रयोगशाळा, नांदेड येथे पत्र (निशाणी क्र.१६) सह पाठविल्याचे, कथन केले. प्रस्तुत प्रकरणात त्यांना रासानियक विश्लेषण अहवाल (निशाणी क्र.१७) प्राप्त झाल्याचे व तो त्यांनी अभिलेखावर दाखल केल्याचे, कथन केले. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने त्यांनी दोषारोप पत्र न्यायालयात सादर केल्याचे, आपल्या पुराव्यात कथन केले.

८. खबर देणार/तपासीक अंमलदार श्री राजेश (अ.सा.क्र.२) यांनी त्यांच्या उलटतपासात असे कथन केले की, घटनेची माहिती त्यांना अंदाजे १६.०० वाजेच्या सुमारास मिळाली होती, तसेच फळेगाव फाटा ते फाळेगाव मधील अंतर अंदाजे दीड ते दोन किमी आहे. पुढे त्यांनी असे कथन केले की, घटनास्थळावरील साक्षीदारांचे बयाने त्यांनी नोंदविले नव्हते. उलटतपासादरम्यान त्यांनी पंचांना घटनास्थळी हजर राहण्याबाबत लेखी नोटीस दिली

नसल्याचे, तसेच घटनास्थळ हे आरोपीच्या मालकीचे असल्याबाबत त्यांनी शहानिशा केली नसल्याचे व त्यांनी वाहकाचे बयान नोंदविले नसल्याचे, कथन केले. उर्वरित सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

९. प्रस्तुत प्रकरणातील **पंच साक्षीदार श्री मुरलीधर (अ.सा.क्र.१)** यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दिनांक ०९.०४.२०१९ रोजी पोलीसांनी त्यांना पंचनाम्याकामी बोलाविले नव्हते, तसेच पोलीसांनी त्यांच्यासमक्ष पंचनाम्याची कोणतीही कार्यवाही केली नव्हती. केवळ घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावर त्यांची सही असल्याचे, परंतु, त्यातील मजकूर त्यांना माहिती नसल्याचे, त्यांनी त्यांचे पुराव्यादरम्यान कथन केले. प्रस्तुत साक्षीदारानी अभियोगपक्षाला कोणताही पाठिंबा दिला नसल्याने विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांनी भारतीय साक्षीपुरावा अधिनियम कलम १५४(१) प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु, त्यात अभियोगपक्षातर्फे अभिलेखावर कोणताही फायेदशिर पुरावा आला नाही.

१०. अभियोगपक्षाने जरी रासायनिक विश्लेषण अहवाल अभिलेखावर दाखल केला असला तरी सदर अहवाल (निशाणी क्र.१७) चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, रासायनिक तपासणीसाठी प्रादेशिक न्यायसहाय्यक वैज्ञानीक प्रयोग शाळा, नांदेड येथे पाठविण्यात आलेल्या द्रव्यामध्ये ४१.३२% मादक द्रव्य (इथील अल्कहोल) होते. अभियोगपक्षाने रासायनिक विश्लेषण अहवालावरुन जरी हे सिध्द केले की, रासायनिक तपासणीसाठी पाठविण्यात आलेल्या द्रव्यामध्ये ४१.३२% इथील अल्कहोल होते, तरी त्यावरुन हे निष्पन्न होत नाही की, रासायनिक विश्लेषणासाठी पाठविण्यात आलेले द्रव्य आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आले होते. खटल्यात अभियोगपक्षाने सबळ पुरावा आणला नाही की, जेणेकरुन हे निष्पन्न होईल की, तथाकथीत घटनेच्यावेळी खबर देणार/तपासीक अंमलदार श्री राजेश ठोके यांनी पंचांसमक्ष आरोपीच्या ताब्यातून प्रत्येकी १८० मिलीच्या देशी दारु भिंगरी संत्राच्या १० बॉटल्स जप्त केल्याचे व त्यांनी जप्त मुद्देमालापैकी १८० मिली दारु रासायनिक तपासणीसाठी न्यायसहाय्यक प्रयोग शाळा, नांदेड येथे पाठविली होती. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने इतर साक्षीदारांना तपासले नाही.

११. फौजदारी विधी तत्वानुसार संशयाच्या पलिकडे जाऊन गुन्हा सिध्द करण्याची पूर्णपणे जबाबदारी अभियोगपक्षाची आहे. खटल्यात आलेल्या पुराव्यावरुन व वर चर्चा केलेल्या कारणावरुन असे स्पष्टपणे दिसुन येते की, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम–६५ (ई) ला लागू करण्यासाठी आवश्यक असणारे घटक अभियोगपक्षाने संशयाच्या पलिकडे जाऊन आरोपीविरुध्द सिध्द केले नाही, म्हणून मी **विचाराधीन प्रश्न क्र.०१ ला नाही** असे उत्तर देतो.

**विचाराधीन प्रश्न क्र.०२ बाबत** –

१२. अभियोगपक्षाच्या एकूण साक्षीपुराव्यावरुन आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा

संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्यामुळे, आरोपीस संशयाचा फायदा देऊन त्याची प्रस्तुत गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. सबब, विचाराधीन प्रश्न क्र.०२ करिता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## :: आ दे श ::

१} आरोपी **गजानन कांताप्रसाद जैस्वाल,** यांना महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम–६५(ई) च्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम–२५५(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येते.

२} आरोपीचा प्रस्तुत प्रकरणातील जामिन कदबा रद्द करण्यात येतो.

३} प्रस्तुत न्यायनिर्णयाचेविरुध्द अपील झाल्यास, अपील न्यायालयामध्ये हजर राहण्याकरिता कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या पुर्ततेकरिता आरोपीने रु. १५,०००/– चा जामीनपत्र व वैयक्तिक जात मुचलका न्यायालयामध्ये दाखल करावा.

४} प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल अपिलाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे कायदेशिर विल्हेवाटीकरिता पाठविण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VAIBHAV VASANTRAO JOSHI
Date: 2022.05.02 17:06:13 +0530

**दिनांक –०२.०५.२०२२**
**हिंगोली.**

**{ व्हि.व्हि. जोशी }**
**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**कोर्ट क्र. २, हिंगोली, जि.हिंगोली.**

## ENDORSEMENT

| | | |
|---|---|---|
| Case Argued on | : | 02.05.2022 |
| Judgment dictated on | : | 02.05.2022 |
| Transcription Ready on | : | 02.05.2022 |
| Judgment checked and signed off | : | 02.05.2022 |

## प्रमाणपत्र

असे खात्रीपूर्वक कथन करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मूळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

टंकलेखन – बी. जी. कदम, लघुलेखक (निम्न श्रेणी)